# मनोगत



डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाची स्थापना २० ऑक्टोबर १९६९ रोजी विदर्भातील हवामान, जमीन, भौगोलिक परिस्थिती आणि शेती पध्दती विचारात घेऊन शेती उत्पादन वाढीसाठी संशोधनाद्वारा मदत व्हावी व शेतकऱ्यांना कृषि विषयक मार्गदर्शन व्हावे या उद्देशाने करण्यात आली आहे. विदर्भातील बहुसंख्य शेतकरी कोरडवाहू शेती करीत असल्यामुळे विद्यापीठाने गत ३८ वर्षात कोरडवाहू शेती तंत्रज्ञान व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन संशोधनावर विशेष भर देऊन असे तंत्रज्ञान विकसित केले व त्याचा सातत्याने प्रसार केला आहे. कपाशी, तृणधान्य, कडधान्य, गळीतधान्य, फळ पिके, भाजीपाला इ. पिकांच्या उन्नत वाणांची निर्मिती आणि सुधारित लागवड पध्दती विकसित केल्या आहेत. पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, फलोत्पादन, फुलशेती, औषधी सुगंधी वनस्पती, वनशेती, कापणी पश्चात व पीक मूल्यवृध्दी तंत्रज्ञान, कृषि यांत्रिकीकरण इ. क्षेत्रात संशोधन आघाडीवर असून यासंबंधी शेतकऱ्यांना उपयुक्त शिफारसी करण्यात आल्या आहेत. सुधारित सरळ वाणांचे घरचे घरी बियाणे तयार करणे, गांडूळ खत निर्माण करणे, सेंद्रिय खत तयार करण्याच्या पध्दती, बीज प्रक्रिया, जिवाणू खते, समतल रेषेत पेरणी, आंतरपिके व आंतर मशागत, एकीकृत अन्नद्रव्ये व्यवस्थापन, जैविक कीड व रोग नियंत्रण पध्दती इ. कमी खर्चाचे लागवड तंत्रज्ञान आणि शेतमाल प्रक्रिया पध्दती विकसित करुन अधिक मूल्य मिळण्याचे शाश्वत कृषि तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याचे प्रयत्न विद्यापीठ करीत आहे.

शेतकऱ्यांचे समस्यांची जाणीव व्हावी आणि संशोधनाचे निष्कर्ष प्रयोग शाळेत बंदिस्त न-राहता प्रचार व प्रसाराद्वारे शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी विद्यापीठ अनेक विस्तार शिक्षण उपक्रम राबवित आहे. कृषि प्रदर्शनी, कृषि मेळावे, शेतीदिन, शिवार फेरी, प्रात्यक्षिके, प्रशिक्षण, चर्चासत्रे शेतकऱ्यांच्या शेताला भेटी अशा उपक्रमाद्वारे तसेच वृत्तपत्र, आकाशवाणी, दूरदर्शन, विद्यापीठ प्रकाशने, माहिती वाहिन्या इ. माध्यमांद्वारा कृषि तंत्रज्ञान प्रसार कार्य नियमित सुरु आहे. कृषिसंवादिनीची निर्मितीसुध्दा याच उद्येशाने केली जाते. कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राद्वारे माहिती, प्रकाशने, रोपे, कलमे, बियाणे इ. विद्यापीठ निर्मित निविष्ठा उपलब्ध केल्या आहेत, तसेच दूरध्वनीद्वारे सल्लासुध्दा दिला जातो. फिरते कृषि चिकित्सालय व फिरते कृषि उद्योग मार्गदर्शन केंद्राद्वारे शेतकऱ्यांना शेती विषयक सल्ला आणि कृषि आधारित ग्रामीण व्यवसायाबाबत मार्गदर्शनसुध्दा करण्यात येते. आलिकडे शेतकरी दिलासा अभियान, कृषक-विज्ञान मंच, जिल्हास्तरीय सरपंच मेळावे व दत्तक ग्राम हे कार्यक्रम तंत्रज्ञान प्रसार व शेतकरी-शास्त्रज्ञ तसेच लोकप्रतिनिधींचा संपर्क वाढविण्याचे उपक्रम म्हणून सर्व केंद्रावरुन राबविण्यात येत आहेत.

शेतकरी हा विद्यापीठाचा केंद्रबिंदू असून विद्यापीठ सदैव आपल्या सेवेसाठी तत्पर आहे. शेतकरी विस्तार कार्यकर्ते, कृषि उद्योजक, विद्यार्थी व शेती व्यवसायासंबंधित सर्वांनी कृषिसंवादिनी २००८ चा लाभ घ्यावा. त्यामुळे आपली शेती शाश्वत व आर्थिक दृष्ट्या परवडणारी होईल याची मला आशा आहे. म्हणूनच कृषिसंवादिनी शेतकऱ्यांची कृषि गीता ठरावी ही अपेक्षा.

डॉ. सुरेश खोंडे, संचालक विस्तार शिक्षण यांचे नेतृत्वाखाली प्रा. एम.ए.सगणे, प्रमुख संपादक व सर्व शास्त्रज्ञ आणि त्यांचे सहकारी यांनी कृषिसंवादिनीची निर्मिती केली असून त्यांचे प्रयत्न कौतुकास्पद आहेत.

नववर्षा निमित सर्वांना हार्दिक शुभेच्छा !

**डॉ. व्यंकटराव मायंदे**
कुलगुरु,
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

अकोला

# आमचे प्रेरणास्थान



कृषि क्रांतीचे शिल्पकार : शिक्षणमहर्षि, कृषिरत्न

**स्व. डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख**

जन्म : २७ डिसेंबर १८९८ (गीता जयंती) महानिर्वाण : १० एप्रिल १९६५ (राम नवमी)

# स्फुर्ति



**मा. श्री. एस.एम. कृष्णा**
राज्यपाल, महाराष्ट्र राज्य तथा
कुलपती, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला



**मा.ना. श्री. विलासरावजी देशमुख**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



**मा.ना. श्री. शरदचंद्रजी पवार**
कृषिमंत्री, भारत सरकार

# मार्गदर्शन



**मा.ना. श्री. आर.आर. पाटील**
उपमुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य



**मा.ना. श्री. बाळासाहेब थोरात**
कृषिमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा
प्रतिकुलपती, डॉ. पं.दे.कृ.वि, अकोला



**मा. श्री. विजयराव कोलते**
उपाध्यक्ष,
महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे



**मा.ना. श्री. राणा जगजितसिंह पाटील**
कृषि राज्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य